विषयः- कोरोना विषाणुंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणुन <u>**दहेली तांडा गाव**</u> **Containment Zone घोषीत करणेबाबत.**

वाचा:-

१.आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५

२.साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७ चे कलम २,३ व ४

३.महाराष्ट्र कोरोना (कोव्हीड-१९) उपाययोजना नियम २०२०

४.सार्वजनिक आरोग्य विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य५ दि.१४.०३.२०२०

४.मा.प्रधान सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग,मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दिनांक १५.०३.२०२०.

५.मा.जिल्हाधिकारी नांदेड यांचे पत्र क्र.२०२०/आपत्तीव्यवस्थापनकक्ष/टे-१/को/सिआर दिनांक १७.०४.२०२०

६.मा.जिल्हाधिकारी नांदेड यांचे पत्र क्र.२०२०/आपत्तीव्यवस्थापनकक्ष/टे-१/को/सिआर दिनांक .०५.२०२०

**सहायक जिल्हाधिकारी तथा Incident Commander किनवट जि.नांदेड यांचे कार्यालय**

जा.क्र.२०२०/आ.व्य/कोरोनाप्रतिउपा/czs/प्र.क्र.-०१ दिनांक .०५.२०२०

**-:आदेश:-**

ज्याअर्थी संदर्भ क्र.३ अन्वये मा.प्रधान सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणुंचा (कोविड१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासुन लागु करून खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४.०३.२०२० रोजी अधिसुचना निर्गत केली आहे.

ज्याअर्थी <u>**दहेली तांडा**</u> येथे निवासासाठी परजिल्हा/राज्यातून आलेले व्यक्ती कोरोना रुग्ण असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याअर्थी मी अभिनव गोयल (भा.प्र.से.) सहाय्यक जिल्हाधिकारी तथा Incident Commander उपविभाग किनवट जि.नांदेड संपुर्ण <u>**दहेली तांडा हे गाव Containment Area**</u> म्हणुन घोषीत करीत आहे व [illegible] <u>**दहेली हे बफर झोन**</u> म्हणुन घोषीत करीत आहे. तसेच Containment Zone च्या संपुर्ण परीसरात कलम १४४ लागु करण्यात येत आहे. <u>**दहेली तांडा**</u> गावाच्या हददीमध्ये कुणीही प्रवेश करणार नाही अथवा बाहेर जाणार नाही. तसेच गावातील दुकाने पुर्णपणे बंद राहतील.

तसेच उपरोक्त प्रमाणे घोषीत केलेल्या Containment Zone मध्ये या रोगाचा प्रसार रोखण्यासंबंधाने तपशिलवार धोरण व करावयाचे उपाययोजना वेळोवेळी जाहीर करण्यात आले असुन, त्याबाबत आरोग्य विभागाने सुध्दा प्रमाणित कार्यपध्दती (SOP) जाहीर केलेली आहे. त्या अनुषंगाने सदर Containment Zone मध्ये विविध उपाययोजना व नियोजन संबंधित विभागाने करावी.

१.Containment Area मध्ये पुर्णपणे संचारबंदी लागु राहील आणि सदरचे क्षेत्रात प्रवेश आणि निर्गमित करण्यात बंदी असेल. अत्यावश्यक सेवा जसे किराणा साहीत्य व भाजीपाला, दवाखाना/मेडीकल यांची आवश्यकता असल्यास ग्रामपंचायत/आरोग्य यंत्रणेमार्फत त्याचा पुरवाठा मागणी प्रमाणे सशुल्क करण्यात येईल.

२.Containment Area मधील सर्व घरांचे सर्वेक्षण निर्धारीत वेळेत पुर्ण करावे.

४.Containment Area योग्य त्या वैदयकीय पथकाची नियुक्ती तालुका आरोग्य अधिकारी यांनी तात्काळ करावी.

५.सदर क्षेत्राच्या चेक पोस्ट प्रवेश व निर्गमन ठिकानावर आरोग्य विभागातील पथकाव्दाने तपासणी करण्यात यावी.

६.कोरोना विषाणु (कोव्हीड-१९) लागन रुग्णाचे संपर्कात आलेल्या सहवासिती व्यक्तींचा तात्काळ शोध घेणे आणि वैदयकीय पथकाने निर्देशाप्रमाणे गृह विलगीकरण/संस्थात्मक विलगीकरण करुन इतर वैदयकीय कार्यवाही तातडीचे करावी.

७.ज्यांना गृह विलगीकरण केलेले आहे त्या व्यक्तीचा वैदयकीय अहवाल येईपर्यंत नियमित पाठपुरावा करण्यात यावा.

८.संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेव्दारे उपरोक्त परीसरांची संपुर्ण स्वच्छता करुन अहवाल सादर करावा.

Abhinav
25/5/2020

९.सर्व संबंधित पथकानतील नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांची कामकाज करतांना वैयक्तीक सुरक्षा उपकरणे आणि शासनाच्या आरोग्य विभागाचे मार्गदर्शक सुचनांचे पालन करावे.

१०.CCC/च्या आदेशाप्रमाणे विविध विभागातील अधिकारी यांनी आपली जबाबदारी पार पाडावी.

| अ. क्र | अधिका-यांचे नाव व पदनाम | संपर्क क्रमांक | सोपविण्यात आलेली जबाबदारी |
|---|---|---|---|
| १. | श्री नरेंद्र तबाजी देशमुख तहसिलदार किनवट | 7588560342 | Incident Commander म्हणुन कामकाज पाहणे. |
| २. | श्री विलास जाधव, उपविभागीय पोलिस अधिकारी, उपविभाग माहूर. | 9870219321 | १.दहेली तांडा, ता.किनवट क्षेत्राची पुर्ण नाकाबंदी करणे,<br>२.प्रवेश व निर्गमण या ठिकाणी बंदोबस्त ठेवणे.<br>३.कलम १४४ ची अंमलबजावणी करणे |
| ३. | श्री एम डी शिवरकर, सहायक पोलीस निरिक्षक, सिंदखेड, माहुर | 9922322312 | १.दहेली तांडा ता.किनवट येथील जमावबंदीचे कालावधीत अत्यावश्यक सोई सुविधा व जिवनावश्यक वस्तु तसेच वैदयकीय दृष्टा तातडीच्या बाबी यांची वाहतुक योग्यरित्या सुरू राहण्यासाठी पासेसची व्यवस्था करणे.<br>२.किराना दुकानांशी संबधित मालवाहतुकीचे वाहने, रूग्णवाहिका यांची अडवणुक होणार नाही याची दक्षता घेणे.<br>३.उपविभागीय पोलीस अधिकारी, माहूर यांना सहाय्य करणे. |
| ४. | श्री सुषाष धनवे (ग.वि.अ.किनवट) | 9403067445 | १.कोरोना संसर्ग झालेल्या व्यक्तींशी जवळच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींची यादी ग्रामस्तरावर तयार करणे.<br>२.घरोघरी सर्वेक्षण करणे करिता नियुक्त केलेल्या पथकाकडुन सर्वेक्षणाबाबतची माहिती प्राप्त करून घेवून योग्यती कार्यवाही करणे.<br>३.अत्यावश्यक सेवा जसे दुध, भाजीपाला, किराणा गावात पुरविण्याबाबत कार्यवाही करणे.<br>४.दोन शिक्षकांची मौ.दहेली तांडा ता.किनवट येथे ग्रामस्थांच्या समुपदेशनासाठी नियुक्ती करणे. |
| ५. | डॉ.संजय मुरमूरे तालुका आरोग्य अधिकारी, किनवट | 9011330733 | १.हायरिस्क पेशंट व लो रिस्क पेशंट यांच्यासाठी उपाययोजना करणे.<br>२.दहेली तांडा गावात १४ दिवस घरोघरी सर्व्हेक्षण करणे.<br>३.Contact Tracing संपर्कातील व्यक्तींचा शोध घेणे<br>४.विलगीकरण कक्ष (Quarantine Ward) तयार करणे व त्यांचे नियमन करणे यासंदर्भात शासनाच्या वेळोवळी प्राप्त सूचनांप्रमाणे वेगवेगळया देशातून, शहरातून आलेल्या प्रवास्यांची यादी प्राप्त करणे<br>५.सदर यादी संबंधित यंत्रणेला पुढील कार्यवाही करिता उपलब्ध करून देणे<br>६.केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करणे .<br>७.कोरोना संसर्गाच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार वाहन,इमारत अधिग्रहण करणे.<br>८.हाय रिस्क पेशंट उदा.गर्भवती महीला, बि.पी., हायपर टेन्शन यांची काळजी घेणे. |
| ६. | डॉ.उत्तम धुमाळे वैदयकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय, गोकूंदा, ता.किनवट | 9850719846 | १.कोरोना बाधीत व्यक्ती व संशयीत रुग्ण यांच्यावर उपचार करणे.<br>२.कोरोना बाधीत व्यक्ती व संशयीत रुग्ण यांची माहीती दररोज जिल्हाधिकारी कार्यालयास कळविणे.<br>३.कोरोना बाधीत व्यक्ती तसेच CCC केंद्राची देखभाल करणे.<br>४.शासकीय कार्यालयातील आस्थापना व इमारत ईत्यादी संदर्भात विषाणु संसर्गाच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे.<br>५.नमुद सर्व माहिती नियत्रंण कक्षाला वेळोवळी कळविणे . |

Abhimanu 25/5/2020

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | श्री निलेश सुंकेवार न.पं. किनवट. | 9860872320 | १.किनवट नगर पंचायत हद्दीतील होम कॉरन्टाईन बाबत दिलेल्या मार्गदर्शक सुचनांची अंमलबजावणी होते किंवा कसे याची खात्री करणे.<br>२.त्या अनुषंगाने आवश्यकती कार्यावाही करणे व दैनंदिन माहिती नियंत्रण कक्षात देणे.<br>३.किनवट तालुक्यात भाजीपाला, दुध व इतर अत्यावश्यक सुविधा पुरविणे व सदर सुविधा पुरवितांना वेळोवेळी शासनाने दिलेल्या निर्देशाचे पालन होत असल्याबाबत खात्री करणे . |
| ८. | श्री रफीक, ना.तह (म-2) तह. कार्या. किनवट<br><br>श्री विजय रामेश्वर सुरुशे, लिपीक, सहायक, उपविभागीय अधिकारी किनवट. | 9850840041 | १.मा.जिल्हाधिकारी नांदेड यांचे कार्यालयाशी समन्वय ठेवण्यात यावा. २.भारत सरकार, महाराष्ट्र शासन व मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडील आदेश सुचना या बाबत तहसिलदार किनवट/सहायक जिल्हाधिकारी किनवट यांना अवगत करावे.<br>३.मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद, मा.जिल्हाधिकारी नांदेड, उपविभागीय अधिकारी कार्यालय किनवट येथे समन्वय साधून वेळोवेळी आवश्यक ती माहिती सादर करणे.<br>४.वेळोवेळी प्राप्त सुचना/आदेश यांचे पालन करुन जिल्हा माहिती अधिकरी नांदेड यांना प्रसिध्दीसाठी कळविणे व प्रसार माध्यमांचे प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडणे. |
| ९ | श्री सर्वेश मेश्राम तह.कार्या.किनवट (म-1)<br><br>श्री सत्यम हाके, अ.का सहायक, तहसिल कार्यालय किनवट<br><br>श्री गोविंद सुधारकर पांपटवार, लिपीक, सहायक, तह.किनवट | 9405075069<br><br>9552270370<br><br>9881111141 | १.तहसिल कार्यालयातील चालु असलेले नियत्रंण कक्षाशी संबधीत संपुर्ण जबाबदारी नियत्रंण कक्ष प्रमुख म्हणुन पार पाडावी.<br>२.लॉकडाऊनच्या अनुषंगाने इतर विभागाकडुन व जनतेकडुन प्राप्त तक्रारी/अडीअडचणी च्या अनुषंगाने संबधीत विभागाशी समन्वय ठेवून निकाली काढणे.<br>३.वाहन अधिग्रहण व वाहतुक व्यवस्था कामी नियंत्रण ठेवणे.<br>४.तालुक्यातील कायदा व सुव्यवस्थेची कामे करणे.<br>५.कायदा व सुव्यवस्थेसंबंधी शासनाकडुन प्राप्त होणा या-निर्देशानुसार वळोवेळी मा.जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने आदेश निर्गमित करणे.<br>६.उपविभागीय दंडाधिकारी/तालुका दंडाधिकारी तसेच पोलिस प्रशासना समवेत समन्वयाची कामे<br>७.कोरोना विषाणु संसर्गाच्या अनुषंगाने सर्वसाधारण नियंत्रण ठेवणे आवश्यक ती कार्यवाही करणे. |
| १० | श्री लोखंडे, ना.तह, (पुरवठा) किनवट<br>श्री श्रोते, अ.का, सहायक तहसिल किनवट | 9421759608<br><br>9307126685 | १.किनवट तालुक्यात आपत्कालीन परिस्थीतीमध्ये पुरवठा विभांगामार्फत सर्व लाभार्थ्यांना अन्नधान्य ई.सुविधा पुरविणे .<br>२.जिवनावश्यक वस्तुंचा नियमीत स्वरुपातज पुरवठा सुरळीत ठेवणे.<br>३.जिवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार होणार नाही याची वेळीवेळी अचानाक तपासणी करून दखता घ्यावी . |
| ११ | श्री सुभाष पवने, गटशिक्षणाधिकारी, किनवट | 9421745268 | १.तालुका आरोग्य अधिकारी व वैदयकीय अधिक्षक, आरोग्य विभाग व शिक्षण विभाग यांचेशी संमन्वय साधुन कोरोना या संसर्ग आजाराचा किनवट तालुक्यामध्ये जनजागृती व प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे.<br>२.तालुका प्रशासनाच्या अधिकृत संकेत सथळावर,Twiter handler,facebook page ईकती माहिती अनुषंगाने आवश्यवर कोरोना विषयावर संसर्गाच्या . .वेळोवेळी अदयावत करणे<br>३.Media Monitoring and Management बाबत आवश्यकती कार्यवाही करणे. |

25/5/2020

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | डॉ. विक्रम राठोड वैदयकीय अधिक्षक ग्रा.रु.नेत्र रु. मांडवी | 9823285758 | **कोविड केअर सेंटर (CCC) मांडवी यापुर्वी निर्गमीत सर्व आदेशाचे तंतोत पालन करण्यात यावे,** कोव्हीड विषाणू प्रार्दुभाव रोखण्यासाठी आपले परीसरातील **संशयीत रुग्णाना योग्य ते उपचार दयावेत, व** केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी सादर करण्यात यावा. |
| १३ | संजय मुरमुरे, तालुका आरोग्य अधिकारी, किनवट | 9011330733 | **कोविड केअर सेंटर (CCC) तहसिल कार्यालय नवी इमारत यापुर्वी निर्गमीत सर्व आदेशाचे तंतोत पालन करण्यात यावे,** कोव्हीड विषाणू प्रार्दुभाव रोखण्यासाठी आपले परीसरातील **संशयीत रुग्णाना योग्य ते उपचार दयावेत, व** केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी सादर करण्यात यावा. |
| १४ | डॉ.यु.पी.धुमाळे, अधिक्षक, उ.जि.रु.गोकूंदा | 9850719846 | **(डेडीकेटेड कोविड केअर हॉस्पीटल)** DCHC **यापुर्वी निर्गमीत सर्व आदेशाचे तंतोत पालन करण्यात यावे,** कोव्हीड विषाणू प्रार्दुभाव रोखण्यासाठी आपले परीसरातील **संशयीत रुग्णाना योग्य ते उपचार दयावेत, व** केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी सादर करण्यात यावा. |

वरील नियुक्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी. या कामात कोणीही कुचराई/दिरंगाई केल्याचे निदर्शनास आल्यास त्याच्याविरुदध महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम २०२० मधील तरतुद, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ व इतर अनुषंगीक कायदयानुसार कार्यवाही करण्यात येईल याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

तसेच सदर आदेशाचे उल्लंघन करणा-या कोणत्याही व्यक्ती, समुह यांचेविरुदध आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व भारतीय दंड संहीता कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

Abhinav 25/5/2020
(अभिनव गोयल) भा.प्र.से.
सहायक जिल्हाधिकारी तथा
Incident Commander किनवट जि.नांदेड

**प्रतिलिपीः-**

१.मा.जिल्हाधिकारी, नांदेड यांना माहितीस्तवं सविनय सादर.
२.मा.जिल्हा पोलीस अधिक्षक, नांदेड यांना माहीतीस्तव
३.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नांदेड यांना माहीतीस्तव
४.उपविभागीय पोलीस अधिकारी, माहुर यांना अनुपालनास्तव
५. सहा.पोलिस निरीक्षक, सिंदेखेड या अनुपालनास्तव
६.तहसिलदार किनवट यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
७.गटविकास अधिकारी, पं.स.किनवट यांना उपरोक्त प्रमाणे कार्यवाहीस्तव
८.वैदयकीय अधिक्षक, उ.जि.रु.किनवट यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव
९.तालुका आरोग्य अधिकारी, किनवट यांना उपरोक्त प्रमाणे कार्यवाहीस्तव
१०.मुख्याधिकारी, नगर पंचायत किनवट यांना उपरोक्त प्रमाणे कार्यवाहीस्तव
११.पोलीस निरीक्षक किनवट यांना उपरोक्त प्रमाणे कार्यवाहीस्तव
१२.गटशिक्षणाधिकारी, पं.स.किनवट यांना उपरोक्त प्रमाणे कार्यवाहीस्तव.
१३.ग्रामसेवक, ग्रा.पं.दहेली ता.किनवट जि.नांदेड यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव
१४.मंडळ अधिकारी दहेली/तलाठी - दहेली तांडा, दहेली, सारखणी, यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव

Abhinav 25/5/2020
(अभिनव गोयल) भा.प्र.से.
सहायक जिल्हाधिकारी तथा
Incident Commander किनवट जि.नांदेड